SMBT

# Oct Month News Coverage

दैनिक लोकनामा

SMBT

# 'पेन मेडिसिन 'वर रविवारी परिषद

## आयएमए,आयएसए, एसएमबीटीतर्फे उत्तर महाराष्ट्रात प्रथमच आयोजन

**लोकनामा प्रतिनिधी**

**नाशिक** : पाठ किंवा डोकेदुखीपासून अन्य गंभीर स्वरूपाच्या आजारांमध्ये वेदनांचा अनुभव रुग्णांना येतो. रुग्णांच्या वेदना प्रभावीपणे शमवत आधुनिक उपचारपद्धतीचा अवलंब व्हावा, यासाठी 'पेन मेडिसिन : बेसिक्स टू ॲडवान्स' या संकल्पनेवर रविवारी (दि. १०) शालिमार येथील आयएमए सभागृहात एकदिवसीय परिषदेचे आयोजन केले आहे, अशी माहिती आयएमए शाखाध्यक्ष व परिषदेच्या आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. विशाल गुंजाळ यांनी पत्रकार परिषदेत दिली.

इंडियन मेडिकल असोसिएशनची नाशिक शाखा आणि इंडियन सोसायटी ऑफ अनेस्थेसियालॉजीची नाशिक शाखा अणि एसएमबीटी रुग्णालयातर्फे हा कार्यक्रम होणार आहे. आयएसएचे अध्यक्ष डॉ. देवेंद्र चौधरी, आयएमएच्या सचिव डॉ. माधवी गोरे-मुठाळ, आयोजन समितीचे सचिव डॉ. विक्रम सोनवणे आणि आयएसए नाशिकचे सचिव डॉ. महेंद्र गुप्ता, नाशिक रोड आयएमए अध्यक्ष डॉ. स्वप्नांजली आव्हाड व इतर डॉक्टर उपस्थित होते. डॉ. देवेंद्र चौधरी म्हणाले की, डॉक्टरांना या परिषदेत नि:शुल्क सहभागी होता येणार आहे. रुग्णांवर प्रभावी उपचार करता यावे यासाठी डॉक्टरांना ही परिषद मार्गदर्शक ठरेल.

डॉ. माधुरी गोरे-मुठाळ यांनी पेन मेडिसिनमध्ये करिअर करणाऱ्या विद्यार्थ्यांनी परिषदेत सहभागी होण्याचे आवाहन केले. डॉ. महेंद्र गुप्ता म्हणाले, परिषदेमध्ये राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय वक्ते मार्गदर्शन करतील. यामध्ये न्यूकॅस्टल (यूके) येथील डॉ. शैलेश मिश्रा, मुंबईतील डॉ. कैलाश कोठारी, इंदूरचे डॉ. प्रवेश कांठेड, मुंबईचे डॉ. जितेंद्र जैन, नागपूरच्या डॉ. सुनीता लवंगे, ठाण्याच्या डॉ. मंजिरी रानडे, कल्याणचे डॉ. प्रकाश देशमुख, मुंबईचे डॉ. नाना मोरकाणे, डॉ. सिद्धार्थ वर्मा, तसेच पुण्यातील डॉ. उत्तम सिद्धये आणि डॉ. हेमंत क्षीरसागर यांचा सहभाग असेल.



### नागरिकांसाठी मोफत पेन मेडिसिन प्रदर्शन

परिषदेनिमित्त सर्वसामान्य नागरिकांसाठी पेन मेडिसिन प्रदर्शनाचे १० ते २० सप्टेंबरदरम्यान सकाळी ११ ते ६ या वेळेत आयोजन केले आहे. प्रदर्शनातून नागरिकांना वेगवेगळ्या स्वरूपाच्या वेदनांची कारणे व परिणाम, उपचारपद्धती आदींविषयी माहिती जाणून घेता येणार आहे. नागरिकांनी प्रदर्शनाला भेट द्यावी, असे आवाहन डॉ. विशाल गुंजाळ व टीमने केले आहे.

SMBT

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# एसएमबीटी रुग्णालयातर्फे डॉ. झाकीर हुसेन रुग्णालयात कॅन्सर तपासणी



**नाशिक ।** डॉ.झाकीर हुसेन रुग्णालयात मंगळवार दि.(२१) एसएमबीटी रुग्णालय आणि इंडियन कॅन्सर सोसायटीच्या संयुक्त विदयमानाने महिलांसाठी मोफत कॅन्सर निदान तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबीरांमध्ये महिलांच्या तोंडाची, स्तनाची व गर्भाशय मुखाची तपासणी करण्यात आली. ऑगस्ट महिन्यापासून आतापर्यंत २० शिबिरे घेण्यात आली आहेत. त्यात १२०० महिलांनी शिबिराचा लाभ घेतला. शिबीरामध्ये तपासणी सोबतच आवश्यक असलेल्या महिलांचे उपचार सुद्धा मोफत करण्यात येतात. शिबीराचे उद्घाटन महानगर पालिकेचे मुख्य आरोग्य अधिकारी डॉ.तानाजी चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ.झाकीर हुसेन रुग्णालयातील निवासी वैद्यकीय अधिकारी नितीन रावते, रुग्णकल्याण समितीचे जुबेर हाश्मी, हिरे मॅडम, शाहिस्ता काझी मॅडम, मेन्ट्रस वैशंपायन यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच शिबीर यशस्वीतेसाठी एस.एम.बी.टी रुग्णालयाच्या डॉ. आश्विनी देशमुख, व इंडियन कॅन्सर संस्थेच्या डॉ.सायली भेलसेकर यांच्यासह एस.एम.बी.टी रुग्णालयाचे डॉक्टर, स्टाफ इंडियन कॅन्सर संस्थेचे पदाधिकारी व डॉ.झाकीर हुसेन रुग्णालयातील कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

AaplaMahanagar Edition
Nov 23, 2023 Page No. 5
Powered by : eReleGo.com

नवराष्ट्र

### पंधरा हृदय शस्त्रक्रिया तज्ञांची उपस्थिती

# एसएमबीटीत अत्याधुनिक रोव्हस कार्यशाळा संपन्न

नाशिक, (वा.) एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये रोव्हस म्हणजेच अन्जिओप्लास्टीशी निगडीत रोटा आणि आयव्हस कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूटचे विभागप्रमुख डॉ गौरव वर्मा यांनी उपस्थित हृदयरोग तज्ञांना नव्या तंत्रज्ञानाची माहिती आली. डॉ. सुरेश पाटील व डॉ. महेश अहिरे यांनी प्रत्यक्ष सहभाग यावेळी घेतला. याप्रसंगी उत्तर महाराष्ट्रातील १५ नामवंत हृदयरोग तज्ञांची उपस्थिती होती. एसएमबीटीचा हृदयविकार विभाग योग्य असून याठिकाणी मोफत या प्रक्रिया केल्या जात आहेत.

एसएमबीटीतील हार्ट इन्स्टिट्यूट उत्तर महाराष्ट्रातील सर्वांत अद्ययावत समजले जाते. याठिकाणी अत्याधुनिक कॅथलब आहे. येथील ऑपरेशन थिएटर्स अतिशय अत्याधुनिक आहेत. त्यामुळे याठिकाणी येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला दर्जेदार उपचार उपलब्ध झाले आहेत. हृदयातील कॅल्शियमचे ब्लॉकिजेस दूर करण्यासाठी ॲन्जिओप्लास्टीमध्ये अनेक नवनवीन संशोधने झाली आहेत. यातीलच नवा आयाम म्हणून रोटा आणि आयव्हस कडे बघितले जाते. रोटा प्रकारात एक अत्याधुनिक मशीन हृदयाच्या धमनीमधील कडक झालेले कॅल्शियमच्या ब्लॉकिजेसचा अडसर दूर करून रक्तवाहिनी रक्तपुरवठ्यासाठी पूर्ववत करतात. तर आयव्हस तंत्रज्ञानाने मशीनच्या माध्यमातून रुग्णाच्या हृदयातील परिस्थितीचे छायाचित्रे काढली जातात. त्यामाध्यमातून डॉक्टर उपचार करतात. या दोन्हीही तंत्रज्ञाने केल्या जाणाऱ्या ॲन्जिओप्लास्टीचे प्रशिक्षण याप्रसंगी डॉ. वर्मा यांनी उपस्थित हृदयरोग तज्ञांना दिले.याप्रसंगी हृदयरोग तज्ञांच्या शंकांचे निरसनदेखील त्यांच्याकडून करण्यात आले.

> एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूट प्रामुख्याने दोन प्रकारात विभागले गेले आहे. यात कॅथलॅब आणि सीव्हीटीएस असे हे दोन विभाग आहेत. इतर ठिकाणी ज्या क्लिष्ट शस्त्रक्रिया त्यांच्या कॅथलॅब आणि डॉक्टरांकडून होत नाहीत त्या शस्त्रक्रिया आपण एसएमबीटी हार्ट इन्स्टीट्युटमध्ये करतो आहोत. कॅथलॅबमध्ये ईसीजी, २ डी इको, टीएमटी, ॲन्जीओग्राफी, अद्ययावत ॲन्जिओप्लास्टी, बलून प्रोसिजर, पेसमेकर, इम्प्लांट तर सीव्हीटीएस मध्ये बायपास शस्त्रक्रिया, हृदयाचा व्हॉल बदलणे, व्हॉल दुरुस्ती, यावर प्रामुख्याने उपचार केले जातात.
>
> **- डॉ. गौरव वर्मा,** विभागप्रमुख, एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूट

> आजची कार्यशाळा खूप चांगली झाली. हा अनुभव अविस्मणीय आहे सोबतच दैनंदिन कामकाजात यामुळे फायदा नक्की होईल. क्लिष्ट अँजीओप्लास्टी करताना यामुळे मार्गदर्शन नक्की मिळेल. यापुढेही एसएमबीटीच्या तज्ञ डॉक्टरांकडून नवनवीन आयाम अनुभवता येतील यात शंका नाही.
>
> **- डॉ अमोल पाटील,** हृदयविकारतज्ञ

Nashik Plus Edition
21 October 2023 Page No. 3
epaper.navarashtra.com

SMBT



# एसएमबीटीमध्ये अत्याधुनिक रोव्हस कार्यशाळा संपन्न

**नाशिक (प्रतिनिधी) :-** उत्तर महाराष्ट्रातील सर्वांत अत्याधुनिक आणि अद्ययावत समजल्या जाणाऱ्या एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूटमध्ये अनेक क्लिष्ट शस्त्रक्रिया केल्या जात आहेत. नुकतीच एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये रोव्हस म्हणजेच ॲन्जिओप्लास्टीशी निगडित रोटा आणि आयव्हस कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूटचे विभागप्रमुख डॉ. गौरव वर्मा यांनी उपस्थित हृदयरोगतज्ज्ञांना नव्या तंत्रज्ञानाची माहिती आली. डॉ. सुरेश पाटील व डॉ. महेश अहिरे यांनी प्रत्यक्ष सहभाग यावेळी घेतला. याप्रसंगी उत्तर महाराष्ट्रातील १५ नामवंत हृदयरोगतज्ज्ञांची उपस्थिती होती.

या प्रकारच्या ॲन्जिओप्लास्टीसाठी अधिक खर्च येतो शिवाय प्रत्येक हृदयविकारतज्ज्ञ त्यांच्या कॅथलॅबमध्ये करू शकत नाहीत. त्यामुळे एसएमबीटीचा हृदयविकार विभाग योग्य पर्याय असून, याठिकाणी या प्रक्रिया मोफत केल्या जात आहेत.



बदलत्या तंत्रज्ञानाची कास धरत दररोज नवनवीन संशोधने होत आहेत. काळानुसार बदल आत्मसात करत एसएमबीटी सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरांत दर्जेदार आरोग्यसुविधा देत आहे. नामवंत डॉक्टरांच्या माध्यमातून एसएमबीटीचा लौकिक सर्वदूर पोहोचला आहे.

येथील हार्ट इन्स्टिट्यूट उत्तर महाराष्ट्रातील सर्वात अद्ययावत समजले जाते. याठिकाणी अत्याधुनिक कॅथलब आहे. येथील ऑपरेशन थिएटर्स अतिशय अत्याधुनिक आहेत. त्यामुळे याठिकाणी येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला दर्जेदार उपचार उपलब्ध झाले आहेत. हृदयातील कॅल्शियमचे ब्लॉकेजेस दूर करण्यासाठी ॲन्जिओप्लास्टीमध्ये अनेक नवनवीन संशोधने झाली आहेत. यातीलच नवा आयाम म्हणून रोटा (ROTA) आणि आयव्हस (IVUS)कडे बघितले जाते.

रोटा प्रकारात एक अत्याधुनिक मशीन हृदयाच्या धमनीमधील कडक झालेले कॅल्शियमच्या ब्लॉकेजेसचा अडसर दूर करून रक्तवाहिनी रक्तपुरवठ्यासाठी पूर्ववत करतात. तर आयव्हस तंत्रज्ञानाने मशीनच्या माध्यमातून रुग्णाच्या हृदयातील परिस्थितीचे छायाचित्रे काढली जातात. त्या माध्यमातून डॉक्टर उपचार करतात. या दोन्ही तंत्रज्ञानाने केल्या जाणाऱ्या ॲन्जिओप्लास्टीचे प्रशिक्षण याप्रसंगी डॉ. वर्मा यांनी उपस्थित हृदयरोगतज्ज्ञांना दिले. याप्रसंगी हृदयरोगतज्ज्ञांच्या शंकांचे निरसनदेखील त्यांच्याकडून करण्यात आले.

नागरिकांनी आरोग्यपूर्ण जीवनशैलीचा अंगीकार करावा, हा मूळ हेतू एसएमबीटी हॉस्पिटलचा आहे. त्या दृष्टीने वाटचाल सुरू असताना स्थापनेपासून ते आतापर्यंत रुग्णांना अद्ययावत, दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात हॉस्पिटल प्रशासन यशस्वी ठरले आहे.

नागरिकांना हृदयासंबंधीच्या समस्या निर्माण होऊ नयेत अथवा त्या झाल्यास त्यावर योग्य पद्धतीने तत्काळ उपचार व्हावेत, हार्ट इन्स्टिट्यूट कार्यान्वित करण्यामागचा उद्देश आहे. राज्य शासनाच्या महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना व प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेशी एसएमबीटी हॉस्पिटल संलग्न असल्याने या योजनेच्या माध्यमातून हृदय शस्त्रक्रिया व उपचार पूर्णपणे मोफत केले जात आहेत.

**सर्वात अद्ययावत हार्ट इन्स्टिट्यूट**

एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूट प्रामुख्याने दोन प्रकारांत विभागले गेले आहे. यात कॅथलॅब आणि सीव्हीटीएस असे हे दोन विभाग आहेत. इतर ठिकाणी ज्या क्लिष्ट शस्त्रक्रिया त्यांच्या कॅथलॅब आणि डॉक्टरांकडून होत नाहीत त्या शस्त्रक्रिया आपण एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूटमध्ये करतो आहोत. कॅथलॅबमध्ये ईसीजी, २डी इको, टीएमटी, ॲन्जीओग्राफी,अद्ययावत ॲन्जिओप्लास्टी, बलून प्रोसिजर, पेसमेकर, इम्प्लांट तर सीव्हीटीएसमध्ये बायपास शस्त्रक्रिया, हृदयाचा व्हॉल्व्ह बदलणे, व्हॉल्व्ह दुरुस्ती, यावर प्रामुख्याने उपचार केले जातात.

– डॉ. गौरव वर्मा, विभागप्रमुख, एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूट

SMBT

# एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूटमध्ये अत्याधुनिक रोव्हस कार्यशाळा



## १५ हृदय शस्त्रक्रिया तज्ज्ञांची उपस्थिती

**नाशिक** : उत्तर महाराष्ट्रातील सर्वांत अत्याधुनिक आणि अद्ययावत समजल्या जाणाऱ्या एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूटमध्ये नुकतीच रोव्हस म्हणजेच ॲन्जिओप्लास्टीशी निगडित रोटा आणि आयव्हस कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. इन्स्टिट्यूटचे विभागप्रमुख डॉ. गौरव वर्मा यांनी उपस्थित हृदयरोग तज्ज्ञांना नव्या तंत्रज्ञानाची माहिती दिली. डॉ. सुरेश पाटील व डॉ. महेश अहिरे यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. याप्रसंगी उत्तर महाराष्ट्रातील १५ नामवंत हृदयरोग तज्ज्ञांची उपस्थिती होती.

अशा प्रकारच्या शस्त्रक्रियांसाठी एसएमबीटीचा हृदयविकार विभाग योग्य पर्याय असून, याठिकाणी या प्रक्रिया मोफत केल्या जात आहेत. हृदयातील कॅल्शियमचे ब्लॉकिजेस दूर करण्यासाठी ॲन्जिओप्लास्टीमध्ये अनेक नवनवीन संशोधने झाली आहेत. यातीलच नवा आयाम म्हणून रोटा आणि आयव्हस कडे बघितले जाते. रोटा प्रकारात एक अत्याधुनिक मशीन हृदयाच्या धमनीमधील कडक झालेल्या कॅल्शियमच्या ब्लॉकिजेसचा अडसर दूर करून रक्तवाहिनीस रक्तपुरवठ्यासाठी पूर्ववत करते; तर आयव्हस तंत्रज्ञानाने मशीनच्या माध्यमातून रुग्णाच्या हृदयातील परिस्थितीची छायाचित्रे काढली जातात. त्या माध्यमातून डॉक्टर उपचार करतात. या दोन्हीही तंत्रज्ञानाने केल्या जाणाऱ्या ॲन्जिओप्लास्टीचे प्रशिक्षण याप्रसंगी डॉ. वर्मा यांनी दिले. तसेच, त्यांच्या शंकांचे निरसनदेखील केले. राज्य शासनाच्या महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना व प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेशी एसएमबीटी हॉस्पिटल संलग्न असल्याने या योजनेच्या माध्यमातून हृदय शस्त्रक्रिया व उपचार पूर्णपणे मोफत केले जात आहेत.

इतर ठिकाणी ज्या क्लिष्ट शस्त्रक्रिया त्यांच्या कॅथलॅब आणि डॉक्टरांकडून होत नाहीत, त्या शस्त्रक्रिया एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूटमध्ये करत आहोत.

– **डॉ. गौरव वर्मा,** विभागप्रमुख, एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूट

कार्यशाळा चांगली झाली. हा अनुभव अविस्मणीय आहे, क्लिष्ट अँजिओप्लास्टी करताना यामुळे मार्गदर्शन नक्की मिळेल. यापुढेही एसएमबीटीच्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून नवनवीन आयाम अनुभवता येतील, यात शंका नाही.

– **डॉ अमोल पाटील,** हृदयविकार तज्ज्ञ जळगाव

या सीएमईचा खूप फायदा होणार आहे. डॉ वर्मा यांनी खूप छान पद्धतीने रोटा आणि आयव्हस या तंत्रज्ञानाला समजून सांगितले.

– **डॉ. सुदाम झरे,** हृदयविकर तज्ज्ञ अहमदनगर

लोकमत

# एसएमबीटीत ७० हजार रुग्णांवर उपचार

## वर्धापन दिन उत्साहात : टू-डी इको अवघ्या ५०० रुपयांत उपलब्ध

**नाशिक :** एसएमबीटी हॉस्पिटलच्या नाशिक येथील क्लिनिकचा पाचवा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याठिकाणी आतापर्यंत तब्बल ७० हजारपेक्षा अधिक रुग्णांवर मोफत सल्ला व उपचार करण्यात आले असून येत्या ३० सप्टेंबरपर्यंत टू-डी इको तपासणी अवघ्या पाचशे रुपयांत करण्यात येत आहे. यासोबतच इतर अनेक तपासण्या सवलतीच्या दरात उपलब्ध केल्या आहेत.

यावेळी सवलतीच्या दरात पहिल्या टू-डी ईको चाचणीला सुरुवात करण्यात आली. याठिकाणी महागड्या समजल्या जाणाऱ्या दंत चिकित्सेवरदेखील अल्पदरांत उपचार होत असून दंत प्रत्यारोपणात मोठी सवलत देण्यात येत आहे. पाच वर्षांपूर्वी सर्वसामान्य गरजू रुग्णांना उत्तम दर्जाची आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, यासाठी हे क्लिनिक सुरू करण्यात आले. याठिकाणी दंत तपासणी मोठ्या संख्येने वाढली. यामुळे रुग्णांच्या आग्रहास्तव दंतचिकित्सेचे संपूर्ण युनिट उभारण्यात आले आहे. सवलतीच्या दरांत अनेक महागड्या तपासण्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. सर्व प्रकारच्या रक्त तपासण्यादेखील अल्पदरात केल्या जात आहेत. (वा.प्र.)



### अनोखे हब ॲण्ड स्पोक मॉडेल

एसएमबीटी हॉस्पिटलने सर्वसामान्य रुग्णांच्या सोयीसाठी हब ॲण्ड स्पोक मॉडेल विकसित केले आहे. या माध्यमातून नाशिक, शहापूर आणि भिवंडी येथे पॉलिक्लिनिक सुरू करण्यात आले असून याठिकाणी स्पेशालिटी आणि सुपरस्पेशालिटी ओपीडी नियमित सुरू करण्यात आली आहे.

सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात उत्तम दर्जाची आरोग्यसेवा सलग पाच वर्षे अविरतपणे देणे आणि तेही शहरी भागात हा उल्लेखनीय असा मैलाचा दगड आहे. दररोज शेकडो रुग्ण याठिकाणी उपचारासाठी येतात. शासकीय योजनेच्या माध्यमातून एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये मोफत उपचार होत आहेत.

-**डॉ. मीनल मोहगावकर,** अधिष्ठाता, एसएमबीटी हॉस्पिटल

Nashik Main
Page No. 4 Sep 23, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# एसएमबीटीमध्ये रोव्हस कार्यशाळा

## नव तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण : नामवंत हृदय शस्त्रक्रिया तज्ज्ञांची उपस्थिती

नाशिक : एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूटमध्ये रोव्हस (ROVUS) म्हणजेच अन्जिओप्लास्टीशी निगडित रोटा (ROTA) आणि आयव्हस (IVUS) कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूटचे विभागप्रमुख डॉ. गौरव वर्मा यांनी उपस्थित हृदयरोग तज्ज्ञांना यावेळी नव्या तंत्रज्ञानाची माहिती आली.

कार्यशाळेला डॉ. सुरेश पाटील व डॉ. महेश अहिरे यांच्यासह उत्तर महाराष्ट्रातील १५ नामवंत हृदयरोग तज्ज्ञांची उपस्थिती होती. अशा प्रकारच्या अॅन्जिओप्लास्टीसाठी अधिक खर्च येतो, शिवाय प्रत्येक हृदयविकार तज्ज्ञ त्यांच्या कॅथलॅबमध्ये त्या करू शकत नाहीत. त्यामुळे एसएमबीटीचा हृदयविकार विभाग योग्य पर्याय असून, या ठिकाणी मोफत या प्रक्रिया केल्या जात आहेत. हृदयातील कॅल्शियमचे ब्लॉकेजेस दूर करण्यासाठी अॅन्जिओप्लास्टीमध्ये अनेक नवनवीन संशोधने झाली आहेत. यातीलच नवा आयाम म्हणून रोटा (ROTA) आणि आयव्हस (IVUS) कडे बघितले जाते. रोटा (ROTA) प्रकारात एक अत्याधुनिक मशीन हृदयाच्या धमनीमधील कडक झालेले कॅल्शियमच्या ब्लॉकेजेसचा अडसर दूर करून रक्तवाहिनी रक्तपुरवठ्यासाठी पूर्ववत करतात, तर आयव्हस (IVUS) तंत्रज्ञानाने मशीनच्या माध्यमातून रुग्णाच्या हृदयातील परिस्थितीची छायाचित्रे काढली जातात. त्यामाध्यमातून डॉक्टर उपचार करतात. या दोन्हीही तंत्रज्ञाने केल्या जाणाऱ्या अॅन्जिओप्लास्टीचे प्रशिक्षण याप्रसंगी डॉ. वर्मा यांनी यावेळी दिले. (वा.प्र.)

> एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूट प्रामुख्याने दोन प्रकारांत विभागले गेले आहे. यात कॅथलॅब आणि सीव्हीटीएस असे हे दोन विभाग आहेत. इतर ठिकाणी ज्या क्लिष्ट शस्त्रक्रिया त्यांच्या कॅथलॅब आणि डॉक्टरांकडून होत नाहीत त्या शस्त्रक्रिया आपण एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूटमध्ये करतो आहोत.
>
> **- डॉ. गौरव वर्मा,** विभागप्रमुख, एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूट

> कार्यशाळेमुळे दैनंदिन कामकाजात फायदा नक्की होईल. क्लिष्ट अॅंजिओप्लास्टी करताना मार्गदर्शन मिळेल. यापुढेही एसएमबीटीच्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून नवनवीन आयाम अनुभवता येतील यात शंका नाही.
>
> **- डॉ. अमोल पाटील,** हृदयविकारतज्ज्ञ जळगाव

Nashik Main
Page No. 4 Oct 21, 2023
Powered by: erelego.com

पुण्यनगरी

# एसएमबीटी क्लिनिकचा वर्धापन दिन उत्साहात

## ७० हजाराहून अधिक रुग्णांवर उपचार

**नाशिक :** सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कटिबध्द असलेल्या एसएमबीटी हॉस्पिटलच्या नाशिक येथील एसएमबीटी क्लिनिकला पाचवा वर्धापनदिन उत्साहात साजरा झाला. या ठिकाणी आत्तापर्यंत तब्बल ७० हजाराहून अधिक रुग्णांना मोफत सल्ला व मार्गदर्शन करण्यात आले. वर्धापन दिनानिमित्त ३० सप्टेंबरपर्यंत टूडी इको तपासणी पाचशे रुपयांत केली आहे. यासोबतच अन्य काही तपासण्या देखील सवलतीच्या दरात करण्यात येत आहेत.

उत्तर महाराष्ट्रातील सर्वात मोठे चॅरिटेबल हॉस्पिटल असलेल्या एसएमबीटी हॉस्पिटलच्या नाशिक क्लिनिकमध्ये जनरल सर्जरी, जनरल मेडिसिन, बालरोग, स्त्रीरोग शस्त्रक्रिया, कान-नाक-घसा, नेत्ररोग, हृदयविकार शस्त्रक्रिया, मेंदु व मणके विकार शस्त्रक्रिया, किडनी व डायलिसीस, अपघात / अॅक्सिडेंट, कर्करोग, पॅरेलिसिस / स्ट्रोक, क्रिटिकल / इन्टेंसिव्ह केअर, गुडघा व खुबा सांधेरोपण, मूत्रविकार तज्ज्ञ पूर्णवेळ उपलब्ध आहेत.

रुग्णांच्या आग्रहास्तव या ठिकाणी दंतचिकित्सेचे युनिट उभारण्यात आले आहे. मात्र, क्लिनिक आता क्लिनिक राहिले नसून दंत चिकित्सेसह इतर प्रत्येक आजारांवर उपचार करणारे सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल झाले आहे. गत पाच वर्षात एसएमबीटी क्लिनिकने नव्या तंत्रज्ञनाचा वापर करून अत्याधुनिक आणि अद्ययावत उपचारपद्धती रुजविण्यात यश मिळवले आहे. क्लिनिकवरून थेट एसएमबीटी हॉस्पिटलला दररोज सकाळी ८.३० वाजता आणि दुपारी ११.३० वाजता खास रुग्णांच्या सोयीसाठी आरोग्यरथ बससुविधा असून दररोज शेकडो रुग्ण याठिकाणं जाऊन उपचार घेत आहेत.

### एसएमबीटीचे अनोखे हब अॅण्ड स्पोक मॉडेल

◆ एसएमबीटी हॉस्पिटलने सर्वसामान्य रुग्णांच्या सोयीसाठी हब अॅण्ड स्पोक मॉडेल विकासिक केले आहे. यामाध्यमातून नाशिक, शहापूर आणि भिवंडी येथे पॉलीक्लिनिक सुरु करण्यात आले असून याठिकाणी स्पेशालिटी आणि सुपरस्पेशालिटी ओपीडी नियमित सुरु करण्यात आली आहे.

### दातांच्या समस्यांवर विशेष सेवा

◆ एसएमबीटी क्लिनिकमध्ये सध्या दातांच्या समस्यांवर मोठे काम होत आहे. महागड्या समजल्या जाणाऱ्या दातांचे याठिकाणी अभ्यासपूर्ण उपचार केले जातात. यावर्षीपासून दंत रुग्णालयाची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. दात दुखणे, हिरड्यांचे आजार, कॅव्हीटीज, दात किडने, दातांवर डाग पडणे, तोंडामधून दुर्गंधी येणे यासह सवलतीत दंत प्रत्यारोपण याठिकाणी केले जात आहे.

> सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात उत्तम दर्जाची आरोग्यसेवा पाच वर्षे अविरतपणे देणे आणि तेही शहरी भागात, ही उल्लेखनीय बाब आहे. दररोज शेकडो रुग्ण याठिकाणी उपचारासाठी येतात. शासकीय योजनेच्या माध्यमातून एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये मोफत उपचार होत आहेत. रुग्णांनी या सुविधांचा लाभ घ्यावा.
>
> **- डॉ. मीनल मोहगांवकर,**
> अधिष्ठाता, एसएमबीटी हॉस्पिटल






Smart Nashik Edition
Sep 24, 2023 Page No. 4
Powered by : eReleGo.com

SMBT

# एसएमबीटी क्लिनिकमध्ये ७० हजार रुग्णांनी घेतले उपचार

## वर्धापन दिनानिमित्त येत्या ३० तारखेपर्यंत सवलत

**लोकनामा प्रतिनिधी**

**नाशिक** : सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कटिबध्द असलेल्या एसएमबीटी हॉस्पिटलच्या नाशिक येथील एसएमबीटी क्लिनिकला नुकतीच पाच वर्षे पूर्ण झाली. तब्बल ७० हजारांपेक्षा अधिक रुग्णांवर आतापर्यंत याठिकाणी मोफत सल्ला व मार्गदर्शन करण्यात आले.

वर्धापन दिनानिमित्त येत्या ३० तारखेपर्यंत २ डी इको तपासणी अवघ्या पाचशे रुपयांत केली जाणार आहे. यासोबतच इतर अनेक तपासण्या सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.एसएमबीटी हॉस्पिटलच्या नाशिक क्लिनिकमध्ये स्पेशालिटी आणि सुपरस्पेशालिटीतज्ज्ञ यांमध्ये जनरल सर्जरी, जनरल मेडिसिन, बालरोग, स्त्रीरोग, शस्त्रक्रिया, कान-नाक-घसा, नेत्ररोग, हृदयविकार शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, किडनी व डायलिसीस, अपघात, ॲक्सिडेंट, कर्करोग (कॅन्सर), पॅरेलिसिस, स्ट्रोक, क्रिटिकल, इन्टेंसिव्ह केअर, गुडघा व खुबा सांधेरोपण, मूत्रविकारतज्ज्ञ पूर्णवेळ उपलब्ध आहेत. याठिकाणी दंत तपासणी मोठ्या संख्येने वाढली आहे.

यामुळे रुग्णांच्या आग्रहास्तव दंतचिकित्सेचे संपूर्ण युनिट उभारण्यात आले आहे. क्लिनिकवरून थेट एसएमबीटी हॉस्पिटलला रोज सकाळी ८.३० आणि दुपारी ११.३० ला खास रुग्णांच्या सोयीसाठी आरोग्यरथ बससुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, रोज शेकडो रुग्ण याठिकाणी जाऊन उपचार घेत आहेत.




### » अनोखे हब अॅण्ड स्पोक मॉडेल

एसएमबीटी हॉस्पिटलने सर्वसामान्य रुग्णांच्या सोयीसाठी हब अॅण्ड स्पोक मॉडेल विकासित केले आहे. या माध्यमातून नाशिक, शहापूर आणि भिवंडी येथे पॉलिक्लिनिक सुरू करण्यात आले असून, याठिकाणी स्पेशालिटी आणि सुपरस्पेशालिटी ओपीडी नियमित सुरू करण्यात आली आहे. या माध्यमातून तळागाळातील सर्वसामान्य गरजू रुग्णांना शासकीय योजनांच्या माध्यमातून मोफत आरोग्यसेवा पुरविली जात आहे.

**सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात उत्तम दर्जाची आरोग्यसेवा सलग पाच वर्षे अविरतपणे देणे आणि तेही शहरी भागात हा उल्लेखनीय असा मैलाचा दगड आहे. रोज शेकडो रुग्ण याठिकाणी उपचारासाठी येतात. शासकीय योजनांच्या माध्यमातून एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये मोफत उपचार होत आहेत.**

**-डॉ. मीनल मोहगावकर,**
अधिष्ठाता, एसएमबीटी हॉस्पिटल

SMBT

# ‘एसएमबीटी’मध्ये अत्याधुनिक ‘रोव्हस’ कार्यशाळा

## उत्तर महाराष्ट्रात पहिली कार्यशाळा; १५ हृदयरोगतज्ज्ञांची उपस्थिती

> कार्यशाळेचा फायदा दैनंदिन कामकाजात होईल. क्लिष्ट अँजिओप्लास्टी करताना मार्गदर्शन मिळेल. यापुढे ‘एसएमबीटी’च्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून नवीन आयाम अनुभवता येतील.
>
> **- डॉ अमोल पाटील,** हृदयरोगतज्ज्ञ, जळगाव

> डॉ. गौरव वर्मा यांनी छान पद्धतीने रोटा आणि आयव्हस हे तंत्रज्ञान समजावून सांगितले.
>
> **- डॉ. सुदाम झरे,** हृदयरोगतज्ज्ञ, अहमदनगर

**नाशिक, ता. २०** : एसएमबीटी रुग्णालयात ‘रोव्हस’ म्हणजेच अन्जिओप्लास्टीशी निगडित रोटा आणि आयव्हस कार्यशाळा झाली. एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूटचे विभागप्रमुख डॉ. गौरव वर्मा यांनी हृदयरोग तज्ज्ञांना नव्या तंत्रज्ञानाची माहिती दिली. डॉ. सुरेश पाटील व डॉ. महेश अहिरे यांनी सहभाग घेतला. उत्तर महाराष्ट्रातील १५ हृदयरोगतज्ज्ञांची उपस्थिती होती.

एसएमबीटीचा हृदयविकार विभागात अधिक खर्चाच्या ॲन्जिओप्लास्टीची प्रक्रिया मोफत केली जाते. रोटा प्रकारात एक अत्याधुनिक यंत्र हृदयाच्या धमनीमधील कडक कॅल्शियमच्या ब्लॉकेजेसचा अडसर दूर करत रक्तवाहिनी रक्तपुरवठ्यासाठी पूर्ववत करतात. आयव्हस तंत्रज्ञानाने यंत्राद्वारे रुग्णाच्या हृदयातील परिस्थितीचे छायाचित्रे काढली जातात. त्या माध्यमातून डॉक्टर उपचार करतात. राज्य सरकारच्या महात्मा फुले जनआरोग्य योजना व प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेशी एसएमबीटी हॉस्पिटल संलग्न असल्याने योजनेच्या माध्यमातून हृदयशस्त्रक्रिया व उपचार मोफत केले जातात, अशी माहिती कार्यशाळेत देण्यात आली. डॉ. वर्मा म्हणाले, की एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूट दोन प्रकारात विभागले आहे. त्यात कॅथलॅब आणि सीव्हीटीएस याचा समावेश आहे. इतर ठिकाणी ज्या क्लिष्ट शस्त्रक्रिया त्यांच्या कॅथलॅब आणि डॉक्टरांकडून होत नाहीत, त्या शस्त्रक्रिया एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूटमध्ये होत आहेत. कॅथलॅबमध्ये इसीजी, टू-डी इको, टीएमटी, ॲन्जीओग्राफी, ॲन्जिओप्लास्टी, बलून प्रोसिजर, पेसमेकर, इम्प्लांट, सीव्हीटीएसमध्ये ‘बायपास’’ शस्त्रक्रिया, हृदयाचा व्हॉल बदलणे, व्हॉल दुरुस्ती यावर प्रामुख्याने उपचार केले जातात.